ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ११ जून १९५२ | अंक २४

## विविध माहिती

**साखरेचा कारखाना चालू करण्याच्या वाटाघाटी**—मद्रास राज्यांतील पुगालूर येथील साखरेचा कारखाना चालू करण्यासाठी मद्रासचे मुख्य प्रधान व कारखान्याचे चालक ह्यांच्यांत नुकतीच चर्चा झाली. ह्या कारखान्यांतील यंत्रसामुग्री पुन्हा नव्यानें बसविण्याच्या कामीं असलेल्या अडचणी मुख्य मंत्र्यांना समजावून सांगण्यांत आल्या.

**विक्री-कराची सूट**—दिल्लीमधील परकीय वकिलाती अगर प्रतिनिधी मंडळें ह्यांना त्यांनीं केलेल्या खरेदीवरील विक्रीकराची सूट देण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. भारताच्या लष्करी लोकांना वाणसामानाच्या खरेदीवरील विक्रीकर माफ करण्यांत यावा अशी मागणी केली होती. पण ती नाकारण्यांत आली.

**लोकसंख्येचा अभ्यास**—म्हैसूरचें सरकार आणि संयुक्त राष्ट्रसंघाचें लोकसंख्या कमिशन ह्यांच्यातर्फे राज्यांतील लोकसंख्येची पहाणी करण्याचें कार्य चालू आहे. आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा लोकसंख्येवर परिणाम काय होतो, ह्यासंबंधीं ही पहाणी होती. हें काम ऑगस्ट अखेर पूर्ण होईल.

**अन्नभेसळी-विरुद्ध कायदा**—अन्नाच्या व खाण्याच्या पदार्थांत करण्यांत येणाऱ्या भेसळीविरुद्ध एक कायदा करण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे असें समजतें. ह्या कायद्यासंबंधीं राज्य-सरकारांशीं विचार-विनिमय करून नंतर लोकसभेच्या पुढील अधिवेशनांत कायद्याचें बिल मांडण्यांत येणार आहे.

**ब्रह्मदेश कागद तयार करणार**— ब्रह्मदेशाच्या सरकारनें तीन कोटी रुपये भांडवल खर्चून कागद तयार करण्याचा एक कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या कामीं जपानी व अमेरिकन तंत्रज्ञांची मदत घेण्यांत येणार आहे. कारखाना उभारल्यावर त्यांत रोज ५० टन कागद तयार होईल.

**ब्रिटनमधील पार्लमेंटची पहिली स्त्री वार्ताहर**— ब्रिटिश हौस ऑफ कॉमन्समधील वादविवादांचे अधिकृत अहवाल हॅनसार्ड संस्थेतर्फे प्रकाशित होत असतात. ह्या संस्थेच्या लघुलेखकांत आतां मिसेस विंडर नांवाच्या एका स्त्री-वार्ताहराची नेमणूक झाली आहे. सभागृहांतील चर्चेचा अहवाल घेण्याचें काम दर पांच मिनिटांनीं बदलणारे लघु लेखक करीत असतात.

**हॉलंडच्या राणीला भेट**— हेग येथील आंतरराष्ट्रीय कोर्टांत इराणची तेल कारखान्यासंबंधींची भूमिका मांडण्यासाठी इराणचे मुख्य प्रधान डॉ. मुसादिक गेले आहेत. त्यांनीं हॉलंडच्या राणीला भेट देण्यासाठी कांहीं पर्शिअन गालिचे बरोबर नेले आहेत.

**भारतामधील नारळाची लागवड**— भारतांत नारळीखालीं असलेल्या लागवडीचें क्षेत्र एकूण १५,००,००० एकर आहे. त्यापैकीं ९५ टक्के क्षेत्र मद्रास राज्यांत आहे. नारळाच्या जागतिक उत्पादनांत भारताचा क्रमांक तिसरा लागतो. गेल्या वर्षी ३ अब्ज नारळांचें उत्पादन झालें व त्याची किंमत ७८ कोटी रुपयें झाली.

**बिन-बियाच्या लिंबाचें झाड**— ऑस्ट्रेलिआंतील मेलबोर्न शहरांत बिन-बियाच्या लिंबाचें एक झाड होतें. तें तोडल्याबद्दल झाडाच्या मालकानें दोघा जणांकडून १०,००० पौंड नुकसान-भरपाईची मागणी केली आहे. अशा प्रकारचें हें एकच झाड जगांत होतें, असें म्हणतात.

**ब्रिटन जपानी रेशमी कापड घेणार**— जपानकडून कांहीं प्रकारांचें रेशमी कापड आयात करण्याचें ब्रिटननें ठरविलें आहे. ह्या आयातीची परवानगी ३१ सप्टेंबरनंतर देण्यांत येणार आहे. पण परवानेवाल्यांनीं निम्में कापड परत निर्यात केलें पाहिजे, अशी अट घालण्यांत येणार आहे.

**ब्रह्मदेशाला डॉक्टर्स पाहिजेत**— ब्रह्मदेशांत नौकरी करण्यासाठी २०० डॉक्टर्सची गरज असल्यानें त्यांची भरती करण्यासाठी ब्रह्मी सरकारचें एक प्रतिनिधीमंडळ सध्यां भारतांत आलें आहे. मंडळ भारतांत तीन आठवडे रहाणार आहे.

**ट्रॅक्टर्सनें नांगरट**— हैद्राबाद सरकारच्या शेतकी खात्यानें १९५१-५२ सालांत ट्रॅक्टर्सच्या साह्यानें २०,८३० एकर पडीक जमीन लागवडीला आणली. रायचूर, नांदेड, परभणी व वारंगळ जिल्ह्यांत हें कार्य करण्यांत आलें. सुमारें ३० ट्रॅक्टर्सनीं हें काम उरकलें.

**फ्रान्समधील नीतिमत्ता**— फ्रान्समधील १५ वर्षे वयाच्या खालील ९५,१५,००० मुलांपैकीं ३२ टक्के मुलें अविवाहित दंपतीपासून उत्पन्न झालीं, असें फ्रेंच आंकडेविषयक संस्थेनें जाहीर केलें आहे. इंग्लंडमध्यें हें प्रमाण एक-तृतीयांश आहे आणि त्यापैकीं निम्मीं मुलें लग्नानंतर ६ महिन्यांनीं झालेलीं होतीं.

**अमेरिकेंतील औद्योगिक अपघात**—गेल्या वर्षी अमेरिकेंतील कारखान्यांतून झालेल्या अपघातांत १६,००० कामगार दगावले, २० लाख अपंग झाले आणि त्यामुळें ५०० कोटी डॉलर्सचें नुकसान झालें अशी माहिती प्रे. ट्रूमन ह्यांनीं सांगितली. ही घटना एक राष्ट्रीय शोकांतिकाच आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

## परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावत

हिंदच्या परराष्ट्रीय व्यापारांत १९५१-५२ सालीं रु. १५६ कोटींहून जास्त प्रतिकूल तफावत आली. परंतु त्याच्या पूर्वीच्या वर्षी म्हणजे १९५०-५१मध्यें रु. २१ कोटी, ४२ लक्ष अनुकूल तफावत उरली होती. गेल्या वर्षी आलेली रु. १५६ कोटींची प्रतिकूल तफावत चिंतनीय आहे कीं काय याचा विचार केला पाहिजे. मे महिन्यांत १९५२-५३ चें दुरुस्त अंदाजपत्रक लोकसभेला सादर करतांना, अर्थमंत्र्यांनीं परराष्ट्रीय व्यापारी देण्याची परिस्थिति काळजी करण्यासारखी नाहीं अशा आशयाचें विधान केलें. अमेरिकन गव्हाच्या विक्रीमुळें निर्माण झालेला पैसा, जागतिक बँकेकडून मिळालेलें कर्ज, इतर सर्व प्रकारची परराष्ट्रीय मदत, स्टर्लिंग शिलकींतून मिळणारा पैसा, इत्यादींमुळें व्यापारांतील प्रतिकूल तफावत फेडतां आली. परंतु दीर्घकालाच्या दृष्टीनें एवढी प्रचंड तफावत येणें आपल्या अर्थव्यवहाराच्या दृष्टीनें समर्थनीय ठरणार नाहीं. तात्पुरत्या म्हणजे चालू परिस्थितीच्या दृष्टीनें जास्त प्रमाणांत झालेली आयात समर्थनीय ठरेल. कारण, १९५१ या वर्षी झालेल्या रु. ८५० कोटी आयातींपैकीं अन्नधान्यावर रु. १८० कोटी, यंत्रसामुग्रीवर सुमारें रु. ९० कोटी, पेट्रोलियम व तत्सम पदार्थावर रु. ७० कोटी, कापूस व ताग यांच्यावर सुमारें रु. १८० कोटी, धातूंवर रु. ४० कोटी, रासायनिक द्रव्यें, रंग व किरकोळ स्वरूपाचा लोखंडी माल यांच्यावर रु. ५० कोटी, याप्रमाणें खर्च झाला. आयात मालाच्या ह्या आंकड्यांचें पृथक्करण केलें असतां असा एक निष्कर्ष निघतो कीं सध्याचा काल हा विकास-योजनांचा व अन्नविषयक कमकुवत परिस्थितीचा असल्यामुळें धान्याची आयात व यंत्रसामुग्री यांवर प्रमाणापेक्षां अधिक खर्च करावा लागला आहे. नियोजन मंडळाच्या कार्यक्रमाप्रमाणें १९५६ नंतर धान्याची आयात करावी लागणार नाहीं. सुमारें रु. ९० कोटींची यंत्रसामुग्रीची आयात ही नवीन उद्योगधंदे वाढविण्यासाठी झालेली असल्यामुळें ती दोन-तीन वर्षांतच आपलें उत्पादन वाढवूं शकेल. हें खरें ठरल्यास यापुढें यंत्रसामुग्रीच्या आयातीवर गेल्या वर्षा इतका प्रचंड खर्च करावा लागणार नाहीं. कापूस व ताग यांच्या आयातीवरहि १९५१ सालीं विशिष्ट परिस्थितीमुळें रु. १८० कोटी इतका प्रचंड खर्च करावा लागला. या बाबतींतहि सध्यांच कापूस व ताग यांचा देशांतच अंतर्गत पुरवठा वाढत असल्यामुळें यापुढें कमी खर्च करावा लागेल. आयात होणाऱ्या मालांत केवळ चैनीचा व गिऱ्हाइकी स्वरूपाचा माल अगदींच अल्प प्रमाणांत आहे.

केवळ अल्पकालीन घटना म्हणून याचें समर्थन करतां येतें. अर्थमंत्र्यांचें दुरुस्त अंदाजपत्रकावरचें भाषण बारकाईनें वाचलें असतां यापुढें उत्पादनाच्या वाढीवर विशेष भर दिला पाहिजे व परराष्ट्रांच्या किंवा जागतिक संस्थांच्या मदतीवर प्रमाणाबाहेर अवलंबून राहाण्यांत अर्थ नाहीं, हें स्पष्टपणें दिसून येत आहे. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, अन्नधान्याच्या बाबतींत चारपांच वर्षांत आपण स्वयंपूर्ण बनलों, आयात केलेल्या यंत्रसामुग्रीमुळें आपलें औद्योगिक उत्पादन वाढलें, कापूस व ताग यांच्या बाबतींत आपली स्थिति सुधारली तरच परराष्ट्रीय व्यापारांत सुधारणा झालेली दिसून येईल. एप्रिलमध्यें स्टर्लिंग शिलकींत फक्त रु. ७१५ कोटी शिलक आहेत. तेव्हां आणखी तीन-चार वर्षांनीं स्टर्लिंग शिलकींतूनहि आपणाला उचल करतां येणार नाहीं. कारण, सुमारें रु. ५०० कोटी शिलक लंडन येथें कायम ठेवणें आपल्या हिताचें आहे असें तज्ज्ञांचें मत आहे.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिस:—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९९,३८५

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.




# अर्थ

बुधवार, ता. ११ जून, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी बँकिंगच्या वाढीची प्रवृत्ति आणि प्रगति

### कर्जांत वाढ

१९५१ वर्षासंबंधींचा, बँकिंग कंपनीज् ॲक्टाच्या ३६ (२) ह्या कलमाखालील रिझर्व्ह बँकेचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे, तो अत्यंत उद्बोधक असा आहे. १९५० चे मानानें १९५१ हें वर्ष बँकिंगच्या दृष्टीनें अवघड असेंच गेलें. बँकांनीं दिलेल्या कर्जाच्या रकमेनें ह्या वर्षीं उच्चांक गाठला. ११ मे, १९५१ रोजीं शेड्यूल्ड बँकांच्या कर्जाची रक्कम ५८६ कोटी रुपयांवर गेली. म्हणजे, २४ नोव्हेंबर, १९५० नंतरच्या मोसमी कर्जामुळें कर्जांत १८० कोटी रुपयांची भर पडली. २६ ऑक्टोबर, १९५१ रोजीं त्या वर्षांतील सर्वांत कमी कर्जें होतीं, तीं १९५०च्या तत्सम पातळीपेक्षां ९५कोटी रुपयांनीं ज्यास्तच होतीं. १९५१ अखेर बँक कर्जाची रक्कम पुनः फुगून ५५५ कोटी रुपये झाली. तिचें ठेवींशीं प्रमाण ६४% म्हणजे गेल्या वर्षीं तें सर्वांत ज्यास्त होतें ह्यापेक्षां फक्त १% कमी पडलें.

### चढीच्या बाजारभावांची अपेक्षा

ह्यास मुख्य कारण म्हणजे बाजारभावांत चालू राहिलेली वाढ, हें होय. त्यामानानें, आयात व निर्गत मालाच्या किंमती तर ज्यास्तच वाढल्या, आणि आयातहि पण वाढली. औद्योगिक उत्पादनहि १९५० चे मानानें १९५१ मध्यें अधिक झालें; म्हणजे औद्योगिक व आर्थिक व्यवहार हे सर्वच जास्त प्रमाणांत झाले. ह्यांचें उत्कृष्ट निदर्शक म्हणजे क्लिअरिंग हाउसेसमधील चेक्सची २५% वाढलेली उलाढाल आणि ठेवींच्या रकमा अधिक फिरत्या रहाण्याची प्रवृत्ति, हें होय. बँकांच्या कर्जास मागणी तीव्र का राहिली, हें ह्यावरून स्पष्ट होईल. अंतर्गत किंमती पुढें उतरूं लागल्या, तरी आंतरराष्ट्रीय प्रवृत्ति किंमती वाढण्यासच पोषक आहे, असा समज व्यापाऱ्यांनीं करून घेतला. पुढें अधिक नफा मिळेल, ह्या अपेक्षेनें त्यांनीं साठे करण्याचा व बाजारांत मालाचा तुटवडा पाडण्याचा प्रयत्न कायम ठेवला. त्यामुळें, नेहमींच्या मंदीच्या मोसमांतहि बँक-कर्जास प्रचंड मागणी कायम राहिली. प्रारंभीं दिलेल्या आकड्यांचें स्पष्टीकरण असें आहे.

### कर्जपुरवठ्यासाठी धडपड

बँकांकडे कर्जमागणी वाढली, परंतु त्यामानानें ठेवी वाढल्या नाहींत, इतकेंच नव्हें तर त्यांत घटच झाली. १९५१ अखेरच्या ठेवी १९५० अखेरपेक्षां १७ कोटी रुपये कमी होत्या. परंतु जुलै, १९५१ अखेरच्या मानानें त्या ४३ कोटी रुपयांनीं खालीं गेलेल्या होत्या. नोव्हेंबरमध्यें, बँक-रेट वाढला आणि त्याबरोबरच "ओपन मार्केट ऑपरेशन्स" बाबत रिझर्व्ह बँकेचें धोरण बदललें, त्याचा परिणाम बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून अधिकाधिक कर्जें घेण्यांत झाला. बँकांची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक उतरली; शेड्यूल्ड बँक धारण करीत असलेल्या रोख्यांत ५१ कोटी रुपयांची घट झाली. १९४९ चे मानानें १९५० मध्यें बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडून घेतलेल्या कर्जांत ४ कोटींची घट झाली होती; १९५० चे मानानें १९५१ मध्यें १३ कोटींची वाढ झाली. त्या कर्जाची रक्कम १९५१ अखेर १७ कोटी रुपये झाली. मार्च, १९५२ अखेर ती ६१ कोटी रुपयांवर गेली आहे. ह्या सर्वांचा परिणाम बँकांकडील रोख रकमा कमी होण्यांतहि झाला.

### उपाययोजना

बँकांनीं दिलेल्या कर्जांत जी भरमसाट वाढ झाली, त्यामुळें तीन प्रश्न निर्माण झाले: ( १ ) उत्पादनावर आणि व्यापारावर दुष्परिणाम होऊं न देतां 'बँक क्रेडिट'ची वाढ तातडीनें आवाक्यांत आणणें, ( २ ) 'बँक क्रेडिट'च्या नियंत्रणाची दीर्घकालीन योजना करणें, आणि ( ३ ) नाणेबाजारांत 'क्रेडिट'ला लवचीकपणा प्राप्त करून देणें. ह्या तीन्ही दृष्टींनीं कसून प्रयत्न करण्यांत आले. नोव्हेंबरच्या मध्याचे सुमारास बँक-रेट, नोव्हेंबर १९३५ पासून स्थिर असलेला ३% चा ३½% करण्यांत आला. त्याबरोबरच, रिझर्व्ह बँक बँकांकडून सरकारी रोखे विकत न घेतां, त्यांचे तारणावर कर्जें देईल, असें सर्वसामान्य धोरण ठरविण्यांत आलें. ह्या दोन्हींचा तात्काळ अपेक्षित असा परिणाम झाला. 'बँक-क्रेडिट' लवचिक करून कर्जाची मोसमी मागणी पुरी पडावी, ह्यासाठी 'हुंडी-बाजार' निर्माण करण्याचा व वाढविण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँकेनें केला व बँकांना त्यांची डिमांड प्रॉमिसरी नोट + त्यांच्या गिऱ्हाइकांची ( मान्य केलेली ) यूझन्स नोट अथवा बिल ह्यांच्या तारणावर कर्जें देण्यास प्रारंभ केला. मार्च, १९५२ अखेरपर्यंत अशा कर्जाची रक्कम २८ कोटी रुपयांपर्यंत गेली. ज्यांचेकडे किमान १० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत, अशा बँकांनाच ह्या योजनेचा तूर्त फायदा घेतां येतो. प्रयोगादाखल सुरू केलेली ही योजना समाधानकारक ठरली, तर नाणेबाजारांत त्यामुळें मूलग्राही असा बदल घडून येईल अशी अपेक्षा आहे.

### रिझर्व्ह बँकेची कर्जाची मदत

रिझर्व्ह बँकेनें १७ ( ४ ) ( अ ) कलमाखालीं १९५० सालीं शेड्यूल्ड बँकांना सरकारी रोख्यांचे तारणावर १३ कोटी रुपये कर्जाऊ दिले होते; १९५१ मध्यें ही रक्कम ७७ कोटी रुपयांवर गेली. कोणत्याहि एका वर्षीं ह्या कलमाखालीं एवढी मोठी रक्कम रिझर्व्ह बँकेनें ह्यापूर्वीं दिलेली नव्हती. शेड्यूल्ड बँकांनीं घेतलेल्या ७५ कोटी रुपयांच्या ४२८ कर्जांपैकीं १·५ कोटी रुपयांचें फक्त एकच कर्ज ठेवी परत करण्यासाठी होतें; बाकी सर्व तात्कालिक, बँकिंग कारणांसाठीच होतीं.

राज्य ( प्रांतिक ) सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेकडून वाढत्या प्रमाणावर मदत मिळत आहे. १९४८ सालीं १ कोटी रु., १९४९ सालीं ७ कोटी रु., १९५० सालीं ५ कोटी रु. व १९५१ सालीं ९ कोटी रु., ह्याप्रमाणें ती वाढत आहे. त्यांना द्यावयाच्या सहाय्याबाबतच्या अटी नोव्हेंबर, १९५१ पासून पुष्कळच ढिल्या करण्यांत आल्या आहेत.

### शाखांत घट

बँकांच्या शाखांची संख्या १९५१ मध्यें आणखी कमी झाली. १९४८ ते १९५१ ह्या मुदतींत शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत ३२७ चा, म्हणजे १०% घट झाली. १९५१ मध्यें ११९ शाखा कमी झाल्या. बिगर-शेडयूल्ड बँकांच्या शाखा कमी होण्याची प्रवृत्ति बलवत्तर होती; १९४८ ते १९५१ ह्या मुदतींत त्यांच्या ५११ म्हणजे २५% शाखा कमी झाल्या. १९५१ मध्यें शाखांच्या संख्येंत ५६ ची घट झाली. शाखा उघण्यावरील बंधनांमुळें आणि १९५० च्या अवार्डमुळें, खर्च वाढल्याकारणानें शाखांची संख्या कमी होणें अपरिहार्य होतें. किमान भांडवल, बिगर-बँकिंग व्यवसाय करण्यास बंदी, इत्यादि अटींमुळें कित्येक बिगर-शेडयूल्ड बँका बँकांच्या यादींतूनच गळाल्या त्यामुळें त्यांच्या शाखा कमी होण्यास जास्तच कारण घडलें. शेडयूल्ड बँकांच्या शाखांत १९५१ मध्यें घट झाली, त्याचें प्रमुख कारण भारत बँक व पंजाब बँक ह्यांचें बहुंशीं एकत्रीकरण व चार बंगाल बँकांचें एकत्रीकरण हें होय. १९५० अखेर, पंजाब नॅशनल व भारत ह्या दोन बँकांच्या मिळून ४०६ शाखा होत्या, त्यांत १९५१ अखेर १०७ ची घट झाली. चार बंगाल बँकांची एक बँक बनलेल्या युनायटेड बँक ऑफ इंडियानें ३५ शाखा बंद केल्या. एकत्रीकरणामुळें बंद केलेल्या शाखा सोडल्या, तर शेडयूल्ड बँकांच्या शाखांत वास्तविक २२ ची वाढच झालेली आहे, असें आढळून येतें. बँक कचेऱ्यांपैकीं तीन चतुर्थांश मुंबई, मद्रास, पंजाब, उत्तर प्रदेश, प. बंगाल व त्रावणकोर-कोचीन ह्यांत दाटी करून आहेत, आणि त्यांतच नव्या शाखा उघडल्या जात आहे.

### सहकारी बँकांचें वाढतें महत्त्व

हिंदी बँकिंग क्षेत्रांतील सहकारी बँकांचें स्थान बिगर-शेडयूल्ड बँकांपेक्षां ज्यास्त महत्त्वाचें झालेलें आहे. १९५० अखेर बिगर-शेडयूल्ड बँकांकडे ७३ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या, तर जून १९५० अखेर सहकारी बँकांकडे ९० कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. ५२४ शेडयूल्ड बँकांच्या मानानें किती तरी कमी असलेल्या ३८९ सहकारी बँकांनीं ६१ कोटी रुपये कर्जाऊ दिले होते; बिगर-शेडयूल्ड बँकांनीं फक्त ४७ कोटी रुपये कर्जाऊ दिले होते. मात्र, जॉइंट स्टॉक व सहकारी ह्या दोन्ही प्रकारच्या बँकांकडील एकूण ठेवींपैकी सर्व जॉइंट स्टॉक बँकांकडील ठेवी नऊ दशांशाइतक्या होत्या.

हिंदी बँकांत ठेवींशीं वसूल भांडवलाचें व रिझर्व्हजचें प्रमाण १०% पडलें. तें अमेरिकेंतील ८% व ग्रेट ब्रिटनमधाल २% पेक्षां पुष्कळच समाधानकारक आहे. शेडयूल्ड बँकांच्या गटांत तें ९% व बिगर-शेडयूल्ड बँकांच्या गटांत २२% होतें. बिगर-शेडयूल्ड बँकांच्या गटांत २२% चें प्रमाण दुसऱ्या दृष्टीनें पहातां, असमाधानकारकच म्हटलें पाहिजे. कारण, ज्यास्त व्याज देऊनहि पुरेशा ठेवी त्यांना मिळत नाहींत, असा त्याचा अर्थ आहे. १९५१ मध्यें ८ शेडयूल्ड बँका व ६७ बिगर-शेडयूल्ड बँका अशा होत्या, कीं त्यांतील वसूल भांडवल व रिझर्व्हज ह्यांची बेरीज त्यांच्या ठेवीपेक्षांहि अधिक होती.

### "डिमांड" व "टाइम" देणीं

बँकांचीं 'डिमांड' व 'टाइम' देणीं १९५१ मध्यें १७ कोटी रुपयांनीं घटलीं. देण्यापैकीं दोन तृतीयांश 'डिमांड' देणीं होतीं व एक तृतीयांश 'टाइम' देणीं होती. बिगर-शेडयूल्ड बँकांकडील ठेवींत 'टाइम' देणी 'डिमांड' देण्यांपेक्षा दुप्पट होती, ह्याचें कारण, लहान गांवांतून चेकची पद्धत अद्याप फार प्रसार पावलेली नाहीं व तेथेंच ह्या बँकांचे मुख्यतः व्यवहार आहेत.

### कर्जांत शेडयूल्ड व बिगर-शेडयूल्ड बँकांचा वांटा

बँकांनीं दिलेल्या कर्जांपैकीं दोन तृतीयांश कर्जें हिंदी शेडयूल्ड बँकांनीं दिलेलीं होतीं व एक चतुर्थांश एक्सचेंज बँकांनीं दिलेलीं होतीं. बिगर-शेडयूल्ड बँकांचा त्यांतील वांटा घटत चालला आहे. १९४९ मध्यें तो ७% होता; १९५१ मध्यें तो ५% झाला. बहुतेक बँकांनीं त्यांच्या योग्य मर्यादेपलीकडे जाऊन कर्जें दिलेलीं आहेत. १५२ बँकांनीं त्यांच्या ठेवींपेक्षां ज्यास्त कर्जें दिलीं आहेत आणि त्या वगळून १३८ बँकांनीं दिलेल्या कर्जाचें ठेवींशीं प्रमाण ७०% ते १००% होतें. कर्जें ज्यास्त देण्याचें प्रमाण लहान बँकांतून अधिक आढळतें. त्यांचें कार्यक्षेत्र मर्यादित असतें व त्यांना कर्जदारांची पत चांगली माहीत असते, हें त्याचें कारण सांगतां येईल. शेडयूल्ड बँकांच्या त्यांच्या हिंदी शाखांकडे जेवढ्या ठेवी आहेत, त्यापेक्षां ज्यास्त रकमा त्यांनीं भारतांत कर्जाऊ दिलेल्या आहेत. ह्याचा अर्थ, बाहेरील ठेवी आणून भारतांत त्यांनीं त्या गुंतविल्या आहेत, असा होतो.

### उत्पन्न, खर्च व नफा ह्या सर्वांत वाढ

१९५१ मधील सर्व बँकांच्या उत्पन्नाचा व खर्चाचा तपशील अद्याप उपलब्ध नाहीं. परंतु, शेडयूल्ड बँकांच्या आकड्यांवरून असें दिसतें, कीं त्या बँकांचें उत्पन्न वाढलें, खर्च वाढला व नफाहि वाढला. बँकांनीं दिलेल्या कर्जांत वाढ व व्याजाच्या दरांत वाढ, ह्यांचा हा परिणाम आहे. इनव्हेस्टमेंट व इतर रिझर्व्हजमध्यें शेडयूल्ड बँकांनीं १९५० मध्यें फक्त ६ लक्ष रुपये टाकले होते; १९५१ मध्यें १ कोटी, २० लक्ष रु. त्यांत घालण्यांत आले. डिव्हिडंड व नोकरवर्गास बोनस ह्यांत फरक झालेला नाहीं.

### रिझर्व्ह बँकेचें वाढतें नियंत्रण

बँकांनीं दिलेल्या कर्जांत वाढ आणि कर्जावर रिझर्व्ह बँकेचें अधिकाधिक प्रभावी नियंत्रण, ह्या दोन दृष्टींनीं गेलें वर्ष महत्त्वाचें होतें. १७ वर्षें स्थिर असलेला बँक रेट १९५१ मध्यें वाढविण्यांत आला आणि मोसमी कर्जविषयक गरजा भागविण्याचे बाबत धोरण बदलण्यांत आलें. त्यामुळें रिझर्व्ह बँकेचें व्यापारी-पतीवरील नियंत्रण आजवरपेक्षां अधिक प्रभावी झालें आहे. हुंडी बाजार-बिलमार्केट-निर्माण करण्याचा प्रयत्न दूरगामी दृष्टीनें ज्यास्त महत्त्वाचा आहे. बँका आणि व्यापारी ह्यांचें सहकार्य जेवढ्या मोठ्या प्रमाणावर त्यास मिळेल, तेवढ्या प्रमाणांत त्याची उपयुक्तता वाढत जाईल, हें उघड आहे. ३१ मार्च, १९५२ अखेर अशा हुंड्यांवर ३९ कोटी रुपये मंजूर केलेले होते व त्यापैकीं २८ कोटी रुपये प्रत्यक्ष देण्यांत आले होते. कर्जाच्या रकमेबरोबर कर्जदार व कर्जाचा विनियोग ह्यांकडेहि लक्ष देण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न आहे. उपलब्ध पैशाचा अधिकांत अधिक चांगला विनियोग होण्याच्या दृष्टीनें ह्याचें महत्त्व निर्विवाद आहे.

### बँकांवरील अवलंबन कमी केलें पाहिजे

कांहीं बँकांची कार्यपद्धति अद्याप सुधारण्यास बराच वाव असला, तरी सर्वसामान्यपणें बँकिंगचा सुदृढपणा कायम आहे. बँका सर्व कर्जदारांस कर्जें देऊं शकल्या नाहींत, ह्याचा अर्थ चालू भांडवल पुरवण्यासाठीं लोक बँकांवर फार अवलंबून रहातात असा आहे आणि त्यास उपाय बँकांनीं अधिक कर्जें देणें हा नसून, कर्जदारांनीं स्वतःचे अधिक पैसे धंद्यांत घालणें हा आहे.

### प्रगतीच्या व सुधारणेच्या मार्गातील अडचणी

बँकांच्या कारभारांतील दोष टाळून त्या सुधारणें हा युद्धोत्तर बँकिंग कायद्याचा उद्देश आहे. रिझर्व्ह बँकेला जे अधिकार कायद्यानें दिलेले आहेत, त्यांचा बँकिंगच्या व्यवसायावर सुपरिणामच घडून आलेला आहे. अधिक सत्वर प्रगतीचे मार्गांत अनेक अडचणी आहेत: देशाचा प्रचंड विस्तार. 'अ' आणि 'ब' राज्यविषयक विविध कायदेशीर तरतुदी, बँकांची मोठी संख्या, वेगवेगळ्या व्यवस्थापकांचा दर्जा व लायकी ह्यांतील मोठी तफावत, कार्यक्षमता व चोखपणा ह्यांचेबाबत तफावती, बँकांवरील जबाबदारी व त्यांचें महत्त्वाचें राष्ट्रीय कर्तव्य ह्याबाबत जाणीवेचा अभाव, इत्यादि. बँकांचा प्रसार सगळीकडे सारखा झालेला नाहीं, ही गोष्ट तर सुप्रसिद्धच आहे. १९३९ आणि १९४७ ह्यांचे दरम्यान बँक कचेऱ्यांत २३०% वाढ झाली. ह्याचें कारण, ठेवी मिळणें व शाखा काढणें तेव्हां सोपें होतें. युद्धपारिस्थिति निवळल्यानंतर, तोट्यांत चालणाऱ्या शाखा एकामागाहून एक बंद करण्यास बँकांनीं प्रारंभ केला. देशाच्या फाळणीनें आणि बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या नव्या तरतुदींनीं ह्या प्रवृत्तीस अधिकच चालना दिली. तरी पण, एकत्रीकरणामुळें बंद पडलेल्या शाखा सोडल्या तर शाखांची संख्या थोडी वाढलेलीच आढळेल.

### शेतीस कर्जपुरवठा

शेतकऱ्याला कर्जपुरवठा होण्याच्या सोयींत सत्वर वाढ होण्याचें अगत्य सुप्रसिद्धच आहे. त्याशिवाय शेतीची अपेक्षित प्रगति होणार नाहीं. ह्यासंबंधांत रिझर्व्ह बँक काय करूं शकेल, ह्याविषयीं सूचना गाडगीळ–गोरवाला कमिटीकडून लवकरच सादर केल्या जातील. तोंपर्यंत वाट न पहातां, ज्या राज्यांत केंद्रीय सहकारी बँका नाहींत, तेथें त्या स्थापण्याचे व ज्या राज्यांत सहकारी चळवळ प्रगत नाहीं, तेथें तिला चालना देण्याचे प्रयत्न चालू आहेत.

### खाजगी सावकारी

रिझर्व्ह बँकेचा अहवाल नियंत्रित बँकिंगच्या व्यवहारापुरताच मर्यादित आहे; त्यांत खासगी सावकारांच्या व्यवहारांचा समावेश होऊं शकत नाहीं. अंतर्गत व्यापारांत सावकारांचें मोठेंच सहाय्य होत असतें. त्यांचा रिझर्व्ह बँकेशीं संबंध निकटवर्ती करण्याचा प्रयत्न चालू आहे. परंतु त्या मार्गांत अद्याप बऱ्याच अडचणी आहेत.

### भारतांतील प्रमुख शहरें

१९५१ च्या शिरगणतीप्रमाणें, १ लक्ष लोकवस्तीपेक्षां ज्यास्त वस्ती ज्यांत आहे, अशीं ६८ शहरें भारतांत आहेत. त्यांचीं नांवें व त्यांची लोकसंख्या अनुक्रमानें खालीं दिली आहे:—

| शहर | लोकसंख्या |
|---|---|
| कलकत्ता | ३३,४५,३३९ |
| मुंबई | २८,५९,२७० |
| मद्रास | १४,१६,०५६ |
| दिल्ली व नवी दिल्ली | ११,९१,१०४ |
| हैद्राबाद | १०,८५,७२२ |
| अहमदाबाद | ७,८८,३३३ |
| बंगलोर | ७,७८,९७७ |
| कानपूर | ७,०५,३८३ |
| लखनौ | ४,९६,८६१ |
| पुणें | ४,८०,९८२ |
| नागपूर | ४,४९,०९९ |

### नोटांचा नाश न करतां, त्या राखल्या पाहिजेत

मोडीकरतां सोडून बाकीच्या कारणांसाठी मध्यवर्ती सरकार किंवा रिझर्व्ह बँक ह्यांचेकडे ज्या मोठ्या रकमेच्या नोटा येतील, त्यांची मध्यवर्ती सरकारला योग्य वाटेल त्या प्रकारें विल्हेवाट लावण्यांत यावी, असा सध्यांचा नियम आहे. तो बदलण्यांत आला असून, अशा नोटा शिल्लक ठेवण्यांत याव्या, असा नवा नियम करण्यांत आला आहे.


## प्रकट सूचना

श्रीलक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. फलटण, या बँकेची विशेष साधारण सभा रविवार दिनांक २२ जून १९५२ या दिवशीं दुपारीं ५ वाजतां फलटण येथें बँकेच्या इमारतींमधील दिवाणखान्यांत भरणार आहे. या सभेंत पोटनियम ५४ मध्यें सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार व अध्यक्षांच्या अनुज्ञेनें आयत्या वेळच्या कामाचा विचार होणार आहे.

सर्व भागिदारांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे.

संचालक मंडळाच्या आज्ञेवरून

फलटण, श्री. ह. तळवलकर

दि. ३० मे, १९५२ व्यवस्थापक


### बँकिंग कंपन्यांबाबत कांहीं महत्त्वाचीं प्रमाणें

( वर्षाच्या शेवटच्या शुक्रवार )

| कशाचें प्रमाण ? | शेडयूल्ड बँका | | | बिगर–शेडयूल्ड बँका | | | सर्व बँका | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९४९ | १९५० | १९५१ | १९४९ | १९५० | १९५१ | १९४९ | १९५० | १९५१ |
| रिझर्व्हजचें वसूल भांडवलाशीं | ७३ | ७४ | ७८ | ३३ | ३३ | ३८ | ६७ | ६८ | ७२ |
| डिमांड ठेवींचें एकूण ठेवींशीं | ६८ | ६७ | ६५ | ३७ | ३५ | ३२ | ६७ | ६६ | ६४ |
| टाइम ठेवींचें एकूण ठेवींशीं | ३२ | ३३ | ३५ | ६३ | ६५ | ६८ | ३३ | ३४ | ३६ |
| वसूल भांडवल अधिक रिझर्व्हजचें एकूण ठेवींशीं | ९ | ९ | ९ | २० | २१ | २२ | ९ | ९ | १० |
| बँकांकडून घेतलल्या कर्जांचें एकूण ठेवींशीं | ३ | २ | ४ | ७ | ८ | ७ | ३ | ३ | ४ |
| हाताशीं शिल्लक आणि रिझर्व्ह बँकेंत शिल्लक ह्यांचें एकूण ठेवींशीं | १५ | १२ | ११ | ९ | ११ | ९ | १४ | १२ | ११ |
| सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीचें एकूण ठेवींशीं | ४२ | ४२ | ३७ | २५ | २६ | २५ | ४२ | ४२ | ३६ |
| कर्जांचें एकूण ठेवींशीं | ४६ | ४९ | ६७ | ७५ | ७६ | ८० | ४७ | ५० | ६७ |

### अमेरिकेंतील खासगी विमानांचा शेतीस उपयोग

ज्याप्रमाणें मोटारी खासगी मालकीच्या असतात त्याप्रमाणें अमेरिकन लोकांच्या खासगी मालकीचीं विमानेंहि असूं शकतात. परंतु विमान विकत घेणें व चालविणें हें फारच खर्चाचें काम असल्यामुळें खाजगी मालकीच्या विमानांचें खाजगी मालकीच्या मोटारींशीं एकास एक हजार, असें साधारण प्रमाण पडतें. अमेरिकेंतील एकूण खाजगी विमानांची संख्या एक लाखापेक्षां कमीच भरेल. अमेरिकेंतील खाजगी विमानांच्या मालकीची वर्गवारी पाडली तर शेतकरी वर्गाची संख्या सर्वांत जास्त भरेल. रोपें लावणें, आगी विझविणें, गुरें गोळा करणें, जंतुनाशक औषधांचा मारा करणें, अशा कामांसाठी या विमानांचा मोठमोठ्या शेतांतून व कुरणांतून उपयोग करण्यांत येतो. या विमानोपयोगाबाबत शेतकऱ्यांना एवढा जिव्हाळा वाटतो कीं, शेतकीसंबंधांत विमानांचा अधिकाधिक उपयोग करण्यासाठीं त्यांनीं 'नॅशनल फ्लायिंग फार्मर्स असोसिएशन' (राष्ट्रीय विमान–शेतकरी असोसिएशन) या नांवाची एक संस्था स्थापन केली. ज्या शेतकऱ्यांजवळ स्वतःच्या मालकीचीं विमानें नसतात असे शेतकरी रोपें लावणें, खतें पसरणें, इत्यादि गोष्टींसाठी विमानें भाड्यानें घेतात. कारण त्यामुळें वेळाची पुष्कळच बचत होते. सध्यां अशा प्रकारचीं खाजगी मालकीचीं विमानें तयार करणारे ३० कारखाने अमेरिकेंत आहेत.

---

### एका पोस्टाच्या तिकिटाची कथा

निरनिराळ्या देशांचीं जुनीं पोस्टाचीं तिकिटें जमविण्याचा छंद कांहीं लोकांना असतो. ह्या छंदाच्या पोटीं कशा उलाढाली होतात, हें ब्रिटिश ग्यायनाच्या एका पोस्टाच्या तिकिटाच्या कथेवरून चांगलें लक्षांत येतें. जुन्या दुर्मिळ अशा पोस्टाच्या तिकिटांच्या बाजारांत १८५६ सालीं काढण्यांत आलेल्या त्या देशाच्या तिकिटाला आज फार किंमत आहे. तिकिटें जमविण्याचा नाद असलेल्या एका गृहस्थाला, जुने कागदपत्र पहात असतां तें मिळालें. त्यानें तें एका संग्राहकाला ६ शिलिंगाला विकलें. त्या संग्रहकानें मि. थॉमस नांवाच्या एका गृहस्थाला तें १२० पौंडाला विकलें. मि. थॉमस ह्यांनीं तें बर्लिन–वस्तुसंग्रहालयाला भेट म्हणून दिलें. नंतर त्याची फ्रेंच सरकारकडे मालकी आली. त्या सरकारपासून मि. हिड नांवाच्या गृहस्थानें तें ९,७२५ पौंडाला विकत घेतलें. त्यांच्या मरणानंतर त्यांच्या पत्नीनें तें ब्रिटिश म्युझिअमला दिलें. १९४७ मध्यें न्यूयॉर्कला भरलेल्या तिकिटांच्या प्रदर्शनांत तें ठेवण्यांत आलें होतें. नंतर तें चोरीला गेलें आणि कॅलिफोर्निआंतील एका संग्रहकाच्या पदरीं सांपडलें. ह्या गृहस्थाला १९४८ सालीं अटक करण्यांत आली असतां त्याच्याजवळ इतरही बरीच दुर्मिळ तिकिटें सांपडलीं. त्यांची सर्वांची मिळून किंमत सुमारें १,४९,००० डॉलर्स भरली. ब्रिटिश ग्यायनाच्या वरील तिकिटाची किंमत आज सुमारें ५०,००० डॉलर्स म्हणजे जवळजवळ २,५०,००० रुपये आहे. वस्तूच्या दुर्मिळतेमुळें किंमत वाढल्याचें हें उदाहरण अपूर्वच आहे.

---

**जमिनीच्या कसाचा अभ्यास**— भाताच्या जमिनीच्या कसाचा अभ्यास करण्यासाठी भारतीय सरकारच्या अन्न व शेतकी खात्यातर्फे कोइमतूर येथें एक शिक्षण–केंद्र उघडण्यांत येणार आहे. वर्गाचें उद्घाटन अन्नमंत्री श्री. किडवाई ता. १५ जुलै रोजीं करतील. ह्या प्रसंगीं २० राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर रहाणार आहेत असें समजतें.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३०–६–५१ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४३,७६० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,६५,००० |
| ठेवी | रु. | ६७,१९,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७९,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–११–० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १–०–० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
एस. एच. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६७½ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन
अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर
बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया
गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा
पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया
रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें

## ३१ डिसेंबर, १९५१ रोजींचा संक्षिप्त ताळेबंद

| भांडवल व देणें | रु. आ. पै | जिंदगी व येणें | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| मागणी केलेलें व वसूल झालेलें मांडवल<br>प्रत्येकीं रु. १०० चे १०,००० भाग प्रत्येकीं रु. ७५ प्रमाणें मागणी केलेले व वसूल झालेले (वजा अनपेड कॉल्स) | ७,२१,१३५—०—० | रोख व रिझर्व्ह बँकेकडे आणि इंपिरिअल बँकेकडे असलेली शिल्लक | १०,६३,१३०—४—१ |
| भागांपोटीं आगाऊ भरलेले | २५,०९८—०—० | इतर बँकाकडील शिल्लक– चालू खात्यांत... | ३,४९,१८९—५—३ |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | १,४४,८१५—७—२ | इन्व्हेस्टमेंटस्–खरेदी किंमत<br>प्रांतिक व मध्यवर्ती सरकारचे कर्जरोखे व ट्रस्टी सिक्युरिटीज्, शेअर्स, डिबेंचर्स व इतर इन्व्हेस्टमेंट ...<br>(बाजारभावानें किंमत २३,१६,९७९–३–०) | २४,२९,४१०—५—० |
| ठेवी व इतर खातीं<br>मुदतीच्या ठेवी २३,७०,४४६–३–०<br>सेव्हिंग्ज बँक खातीं १६,६९,३४२–११–५<br>चालू व कॉंटिंजन्सी खातीं वगैरे २५,७८,५८३–१२–७ | ६६,१८,३७८–११–० | अडव्हान्सेस | ३६,५५,३७८–४—११ |
| बिल्स पेएबल | ३२,२८९—०—९ | वसुलीसाठीं पाठविलेलीं बिलें (देणेंकडे दाखविलेप्रमाणें) ... | २,५८,०५०—३—३ |
| वसुलीसाठीं आलेलीं बिलें (येणेंकडे दाखविल्याप्रमाणें) | २,५८,०५०—३—३ | जागा व इमारत | १९,५००—०—० |
| इतर लायबिलिटीज् | ३५,१४४—१५—१० | फर्निचर व फिक्स्चर्स (वजा घसारा) | २४,५२३–११—० |
| नफातोटा खातें—<br>मागील ताळेबंदांतून पुढें ओढलेली रक्कम २९८–५–८<br>१९५१ सालचा निव्वळ नफा (ज्यावर इन्कम् टॅक्स देणेंचा असा) ७०,३४५–१४–१ | ७०,६४४—३—९ | इतर असेट्स्– | १,०६,३५३—८—३ |
| कॉन्टिन्जन्ट लायबिलिटीज रक्कम ३७,८८७–८–३ | | | |
| एकूण | ७९,०५,५५५—९–९ | एकूण | ७९,०५,५५५—९–९ |

## ३१ डिसेंबर १९५१ अखेर संपणाऱ्या वर्षाचें संक्षिप्त नफातोटापत्रक

| खर्च | रु. आ. पै | जमा | रु. आ. पै |
|---|---|---|---|
| ठेवींवर व बँकांकडून घेतलेल्या रकमांवर दिलेलें व्याज ... | २,२९,७७७-२-११ | व्याज, आणि डिव्हिडंड ... | ४,०८,२३२—१४-४ |
| पगार, भत्ते, प्रॉ. फंड वगैरे ... | ८५,९०३—०-० | कामिशन, हुंडणावळ व ब्रोकरेज ... | १०,४०६-०-५ |
| डायरेक्टरांची व स्थानिक सल्लागार समित्यांच्या सभासदांची फी व भत्ते | ४,८२१—०-० | भाडें ... | ६९०—०-० |
| ऑफिसभाडें, कर, विमे, दिवाबत्ती इ० | ५,१३७-११-६ | इतर ... | २,५४१-१५-० |
| टपाल, तार, टेलिफोन व स्टँप्स् ... | २,४३६—३-६ | | |
| ऑडिट फी ... | १,२००—०-० | | |
| घसारा व मिळकतीचा दुरुस्ती खर्च | २,६०८-१०-९ | | |
| स्टेशनरी, छपाई, जाहिरात वगैरे ... | ११,३९८— ३-० | | |
| इतर खर्च ... | ८,२४३—०-० | | |
| निव्वळ नफा ... | ७०,३४५—१४-१ | | |
| | ४,२१,८७०-१३-९ | | ४,२१,८७०-१३-९ |

सी. जी. जोशी, अकौंटंट. जी. डी. जोगळेकर, मॅनेजर. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.

बी. सी. अभ्यंकर आणि कं. चार्टर्ड अकौंटंट्स } ऑडिटर्स.

जी. आर. साठे, चेअरमन.
डी. जी. बापट, व्हाइस चेअरमन.

एस. एम्. जोशी, डब्ल्यू. पी. वैद्य, एल. आर. घडफळे, जी. यू. चितळे, एल. एम्. जोशी, एम. एम. भिडे, एस. जी. केणी, } डायरेक्टर्स

# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बँक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन १९११

तारेचा पत्ता : फार्मर बँक
टे. नं. २५४६१

पोस्ट बॉक्स नं. ४७२

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | ४८,८५,२०० |
| गंगाजळी फंड | रु. | ३९,४८,७०० |
| ठेवी | रु. | ६,९२,८४,९०० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,८०,४९,८०० |

**१५ जिल्ह्यांत ६२ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —
लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. १४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्यासेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें; पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३३०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.



# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जवाबदारी मर्यादित असलेली )

**स्थापना : १९४३**

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

**शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.**

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

**श्री. बी. बी. पाटील,** B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

**श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले,** कोल्हापूर, व्हा. चेअरमन

**एल. एन्. शहा,**
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद् वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.